RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MNW/35/2017-2019
Published on : 12 June, 2017 :: Posted at Kandivli(w) Post Office, Mumbai on 14 June, 2017

अजायब बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : चौदा | अंक : बारावा | जून २०१७

तेरी कुदरत तू ही जाणें (भजन) 4

काळाची नगरी (सत्संग) 5

कृपावंत महात्मा (गोष्ट) 27

प्रश्नोत्तरे (प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे) 31

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती) 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

तेरी कुदरत तूं ही जाणे

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे रचलेले एक भक्तीभावात्मक भजन

तेरी कुदरत तूं ही जाणे, होर ना दूजा जाणेगा,
जिस ते मेहर हो जाए तेरी, तैनूं ओही पछाणेगा, (२)

१. युग–युग दे विच आऐ पहलां, नाम कबीर सदाया ऐ,
कर्मकांड तों ठा के दुनियां, परमार्थ विच लाया ऐ, (२)
दु:ख तसीहे झल्ले सारे (२), दस्सया भेद ठिकाणे दा,
जिस, ते मेहर...

२. नानक बण के दुनियां तारी, अंगद नाम धराया है,
अमरदेव गुरू रामदास जी, अर्जुनदेव सदाया है, (२)
गुरू अर्जुन जी लोह ते बैठे (२), शुकर मनाया भांणे दा,
जिस ते मेहर...

३. हरगोविंद हरिराय साहेब जी, हरि कृष्ण जी प्यारे नें,
सतगुरू तेग बहादुर साहेब, शीश धर्म तों वारे नें, (२)
गुरू गोबिंद सिंह रत्नाकर राव ते (२), कीता मांण निमाणे दा,
जिस ते मेहर...

४. तुलसी साहब नाम दे रसिऐ, स्वामी जी नूं तार दित्ता,
स्वामी जी ने जयमल सिंह नूं, नाम दे बेड़े चाड़ दित्ता, (२)
जयमल सिंह दा सावन प्यारा (२), दुध चों पानी छांणेगा,
जिस ते मेहर...

५. सावन सोहणा बाग लगाया, विच बिठाया माली ऐ,
नाम ओहदा कृपाल प्यारा, संगत दा ओह वाली ऐ, (२)
सुणयो अरज गरीब 'अजायब' दी (२), रक्खयो माण निमाणे दा,
जिस ते मेहर...

काळाची नगरी

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, हुजूर स्वामीजी महाराजांची वाणी
मुंबई, महाराष्ट्र – १४ जानेवारी, १९८९

आपल्या पुढे स्वामीजी महाराजांची छोटीशी वाणी सादर केली जात आहे. परमात्म्याचे प्रिय संत–महात्मा जगात स्वत:चा कोणताही फायदा करून घेण्यासाठी येत नाहीत वा ऐशो–आरामाचे जीवन जगण्यासाठी येत नाहीत. खडतर जीवन तर संतांची जहागीर असते. जशी वडिलोपार्जीत संपत्ती मिळते तशी परमात्म्याने संतांना खडतर जीवनाची भेट दिलेली असते.

महाराज कृपाल सांगत असत की जेव्हा परमात्मा सर्वांना उपजीवीकेसाठी अन्न देऊ लागला तेव्हा त्याने संतांच्या हातावर हात ठेवून खालच्या दिशेने ढकलला, त्यामुळे ते अन्न खाली सांडले. परमात्म्याने संतांना सांगितले की तुम्ही संसारात जाऊन ते अन्न गोळा करा. परमात्म्यास माहीत होते की संत जेथे जातील तेथील लोकांकडून भक्ती करवून घेतील, माझ्या स्मरणात बसवतील. परंतु आपण जीव विचित्र बुद्धीचे मालक असतो. जेव्हा महात्मा संसारात येतात तेव्हा फार थोडे लोक त्यांची कदर करतात. जेव्हा महात्मा संसारातून निघून जातात तेव्हा आपण त्यांच्या स्थानात मठ उभारतो आणि त्यास एखाद्या जातीचे वा समाजाचे रुप देतो. ज्यांच्या नावाखाली या गोष्टी बनविल्या गेल्या, ते देहरुपात असताना त्यांच्यापासून जर फायदा करून घेतला असता तर चांगले झाले असते, परंतु आपण सांसारिक जीव सुरवातीपासूनच असे करीत आलो आहोत.

गुरू नानकदेवजी महाराज एके ठिकाणी सत्संगासाठी गेले असता तेथील काही लोकांनी त्यांचा सत्संग ऐकण्याऐवजी त्यांच्यावर दगड–वीटा मारल्या की हे योग्य उपदेश करीत नाहीत. गुरू नानकदेवजी त्यांस म्हणाले,''तुम्ही सदैव येथे रहा.''

गुरू नानकदेवजींसोबत त्यांचे शिष्य बाला आणि मर्दाना देखील होते. गुरू नानकदेवजी आणखी एका गावी सत्संग करण्यासाठी गेले असता तेथील लोकांनी त्यांची खूप सेवा केली. तेथील सत्संगात खूप लोक हजर राहिले. गुरू नानकदेवजींनी त्या लोकांना म्हटले,''तुम्ही विखरून जा.''

संतांच्या बोलण्यामागील गूढ अर्थ फार थोडे प्रेमी समजतात कारण संतांनी सांगितलेल्या प्रत्येक गोष्टीमागे गुपित दडलेले असते. मर्दानाने गुरू नानकदेवजींना विचारले,''महाराजजी, आपण हा कोणता वर देत आहात? ज्या लोकांनी सेवा केली, सत्संग प्रेमाने ऐकला आणि नामाभ्यास केला त्यांस आपण म्हणालात की तुम्ही विखरून जा आणि ज्यांनी आपल्याला दगड-वीटा मारल्या त्यांना तुम्ही सदैव राहण्याचा वर दिलात?''

गुरू नानकदेवजींनी मर्दानास म्हणाले,''तुला मी सांगितलेल्या गोष्टीमागील गुपित माहीत नाही. जे ध्यान-अभ्यास करून अंतर्यात जातात त्यांना या गोष्टीचे ज्ञान असते. मी ज्या लोकांना विखरून जा असे म्हटले त्यांच्यामधील प्रत्येक मनुष्य जिथेही जाईल तिथल्या संपूर्ण गावाचा सुधार करेल. आजुबाजुला राहणाऱ्या लोकांना चांगली शिकवण देईल व माझ्या भक्तीत गुंतवेल. ज्या लोकांनी माझ्यावर दगड-वीटा मारल्या, सत्संगातील शिकवण चुकीची आहे असे मानले, ते त्याच जागी रहावेत जेणेकरून त्यांचा दुर्गंध इतरत्र पसरू नये, कारण ते लोक जेथे जातील तेथील जीवांना माझ्यापासून दूर करवतील.''

कबीर साहेबांना विचारले गेले की संसारात असा कोणता मनुष्य आहे जो इतर मनुष्यांच्या फायद्याचा विचार करतो परंतु त्यामागे त्याचा स्वत:चा कोणताही स्वार्थ दडलेला नसतो. कबीर साहेब म्हणाले सत्याचा कधीही विनाश होत नाही, योग्य वेळी सत्य आपोआपच प्रकाशित होते. असे अनेक गुण वृक्ष व पाऊस यांतही आहेत, परंतु ते आपल्या समजण्या पलिकडे आहे. समुद्राच्या पाण्याची वाफ बनून ती आकाशात उडते व त्याचे ढगात रुपांतर होते. ते पाऊसाच्या रुपात पर्वतांवर पडते व उंच–सखल जागेतून प्रवास करीत ते जमीनीवर येऊन पोहचते. पाणी स्वत: खूप ठेच खाते परंतु ते सकल जगाची तहान भागवते. पाण्याने आपली शेते हिरवीगार होतात. पाणी सकल जगाच्या भल्यासाठी किती ठेच खाते?

त्याचप्रमाणे वृक्षामध्ये असा गुण आहे की ते स्वत:च्या डोक्यावर ऊन सोसते व इतरांना सावली देते. स्वत:च्या अंगातील सत्व वापरून फळ निर्माण करते ज्यापासून मनुष्याची भूक भागते. फळे अनेक प्रकारचे पौष्टीक सत्व आपल्या शरीरास देतात. महात्म्यांमध्येदेखील असाच गुण असतो. परमात्म्याचे प्रिय संतजन स्वत: अनेक कष्ट सहन करतात. ते संसारात येऊन आपल्या प्रिय मुलांना संदेश देतात, परमात्म्याच्या भक्तीचे साधन सांगतात. कबीर साहेब सांगतात:

तरवर सरवर सन्तजन चौथे बरसे मेह। पर स्वार्थ के कारणे चारों धारे देह।।

गुरू नानकदेवजींना विचारले गेले की एखादा असा कोणी मित्र आहे का जो विनामुल्य आपले भले व्हावे असा विचार करतो. ते म्हणाले,''होय, संतांमध्ये हा गुण असतो. संतांना सकल जगाचे भले व्हावे असे वाटते.''

परथाए साखी महा पुरख बोलदे, साँझी सगल जहानें।

पल्टु साहेब सांगतात की संतांचा स्वत:चा कोणता स्वार्थ असतो?

उन्हें क्या है चाह फिरत हैं मुल्क बथेरा।
जीव तारन कारणें सेहंदे दुख घनेरा।।

मी नेहमी सांगतो की अनेक लोकांनी प्रयत्न केले परंतु त्यांच्या संपूर्ण आयुष्यात कोणीही त्यांना पुष्प–हार घालू शकला नाही. संत कोणत्याही प्रकारच्या मान–मोठेपणाचे भुकेलेले नसतात. त्यांना केवळ हीच भूक असते की शिष्याने ध्यान–अभ्यास–नामस्मरण करून आणावे. ते शिष्यांना म्हणतात की तुम्ही ध्यान–अभ्यास–नामस्मरण करून आणा हीच आमची इच्छा आहे, हेच तुमचे माझ्याप्रती खरे प्रेम आहे व हाच खरा नमस्कार आहे.

मी नेहमी सांगतो की लहान मुलास खेळ खूप आवडतो. ते शाळेत जाऊ इच्छित नसते तरी आई–वडील शाळेत त्याची नावनोंदणी करतात. आई–वडील मुलास शिक्षणाचे फायदे समजावतात, त्यास शाळेत जाण्यास कां कूं केल्यास दरडावतात–धमकावतात आणि कधी–कधी आमिषदेखील देतात की तू शिकलास तर उच्च पदाधिकारी बनशील. आई–वडिलांनी तसे केल्याने शिक्षकांना मदत मिळते. शिक्षकांना मुलास शिकविणे सोपे जाते. जेव्हा मुल युनिवरसीटी पास करते, उच्च पदावर त्याची नेमणूक होते तेव्हा त्या मुलाच्या लक्षात येते की अभ्यास करणे किती महत्वाचे होते. आई–वडिलांनी माझ्यावर किती उपकार केलेले आहेत! मुलास शिक्षणाद्वारे ज्ञान प्राप्त होते, ते आपल्या शिक्षकांचा देखील खूप आदर करतात.

आपण पहा, परमार्थ मार्गावर कोणीही आपली मदत करीत नाही. आपले मन मद्य–मांसाहाराचे सेवन करण्याचे, विषय–विकार भोगण्याचे व सांसारिक ऐशो–आरामांचा उपभोग घेण्याचे शौकीन असते. आपल्या हृदयात या गोष्टींसाठी खूप तळमळ लागलेली आहे. एखादा परमार्थ मार्गावरून दूरावलेला आत्मा ध्यान–अभ्यासाच्या मार्गावर आला तर त्या मार्गावर चालण्यासाठी त्याचे आई–वडील देखील त्याची मदत करीत नाहीत, उलट ते त्यास त्यामार्गी जाण्यास मनाई करतात.

गेल्या महिन्यात डिसेंबरमध्ये एक मनुष्य आपल्या मुलास घेऊन माझ्याकडे आला. त्याने हताश होऊन म्हटले की तुम्ही या मुलास समजवून सांगा. मी त्यास विचारले की,''काय झाले? मी त्यास काय समजावू?'' तो म्हणाला, ''पहा, हा मुलगा नेहमी ध्यान–अभ्यास करतो. त्यास समजवा की ध्यान–अभ्यास करू नकोस.'' अशा प्रकारचे प्रसंग जीवनात आपल्या सर्वांच्या बाबतीत घडलेले असतात.

माझे वडील मला साधू–संतांकडेच घेऊन जात असत की हा घरच्या कारभारात लक्ष घालत नाही, मला याची खूप काळजी वाटते. कोण काय मदत करणार, सर्वजण परमार्थापासून दूर करण्याचा प्रयत्न करतात. माझे वडील फिरत–फिरत बाबा बिशनदासजींकडे आले.

बाबा बिशनदासजी अत्यंत स्पष्टवक्ते महात्मा होते. ते बोलताना कधीही कोणत्याही गोष्टीची पर्वा करीत नसत. बाबा बिशनदासजींनी थोडावेळ माझ्याकडे पाहिले व माझ्या वडिलांना म्हणू लागले,''हे बघ बांधवा, हा संसारात तुझ्यासाठी आलेला नसून हा तर परमात्म्याचा दूत आहे.'' माझे वडील हैराण झाले की मी यास बाबांकडे यासाठी आणले होते की हे मुलाच्या डोक्यावरून हात फिरवतील व हा मुलगा घरच्या कारभारात लक्ष घालू लागेल, परंतु यांनी तर काही भलतेच सांगितले. मला दोन शब्दांचे नाम बाबा बिशनदासजींकडूनच लाभलेले आहे.

असेच गुरू नानकदेवजींच्या बाबतीतही घडले. त्यांचे आई–वडील त्यांना कधी कोणत्या मौलवीलडे घेऊन जात असत तर कधी कोणत्या वैद्याकडे घेऊन जात असत की यास काहीतरी आजार आहे, हा घरातील कारभारात लक्ष देत नाही. गुरू नानकदेवजी आपली कल्पना व्यक्त करीत लिहीतात:

कोई आखे भूतना कोई कहे बेताला। कोई आखे आदमी नानक बेचारा।।

कोण भूत–पिशाच्छ म्हणतो तर कोण आणखी एखादा निराळा शब्द वापरून संबोधतो. कोण म्हणतो की हा बिचारा नानक असावा जो घरच्या कारभारात लक्ष न देता भर दुपारी फिरत असतो, कधी कोणत्या गावी जातो तर कधी कोणत्या शहरात जातो.

प्रियजनहो, परमार्थ साधण्यात आपली कोणीही मदत करीत नाही. आपण खेळात मग्न झालेल्या बालकाप्रमाणे विषय–विकारांचे शौकिन असतो. जेव्हा आपण संतांच्या सत्संगात जातो, संतांना आपल्याबद्दल सहानुभुती असते. आपण थोडेफार नामस्मरण केल्यावर ते आपल्यावर कृपादृष्टी एकवटीत करतात तेव्हा आपले ध्यान तिसऱ्या तिळावर एकाग्र होण्यास सुरुवात होते, अंतर्यात प्रकाश दिसू लागतो, तेव्हा आपोआपच बाह्यजगातील खेळातले स्वारस्य नाहीसे होते. अंतर्यात जाऊन गुरूंशी खरे प्रेम आणि खरी श्रद्धा निर्माण होते. मग आपणांस आई–वडील, बहीण–भाऊ किंवा इतर कोणीही यामार्गी जाण्यास मनाई केली तरी आपण तो मार्ग सोडत नाही. आपण परमार्थमार्गावर दृढनिश्चयी बनतो व आपणांस सत्याचे ज्ञान होते.

आपल्याविषयी कोण सहानुभुती दर्शवितो? कोण आपला हितचिंतक आहे? ते सतगुरू आहेत, ज्यांनी आपणांस शब्द–नामाशी जोडले. स्वामीजी महाराज सांगतात, मी या वाणीत तुम्हांस ती गोष्ट समजावण्याचा प्रयत्न करेन जी आपल्या फायद्याची आहे. लक्षपूर्वक ही वाणी ऐका:

कोइ मानो रे कहन हमारी। कोइ मानो रे कहन हमारी।
जो जो कहूं सुनो चित देकर। गौं की कहूं तुम्हारी।।



संतांचा उपदेश एखाद्या खास जातीसाठी, समाजासाठी वा देशासाठी नसतो. त्यांचा उपदेश प्रत्येकासाठी एकसमान असतो. महात्मा सकल जगास आपले घर समजतात. ते संसारात रहाणाऱ्या सर्व आत्म्यांना आपले समजतात. त्यांच्या हृदयात प्रत्येक समाजाप्रती आणि प्रत्येक व्यक्तीप्रती आदर असतो.

आपण सांगता,''महात्म्यांची नजर आत्म्यावर असते. आत्मा निर्दोष आहे, प्रभू–परमेश्वराचा अंश आहे. जर का एखादा दोष किंवा वाईटपणा असेल तर तो आपल्या मनात असतो. महात्म्यांचा उपदेश कोणासाठीही व्यक्तीगत नसतो, तो सर्वांसाठी एकसमान असतो. महात्म्यांचे सर्व जातीय, सर्व समाजातील व सर्व देशातील शिष्य असतात. जो कोणी त्यांच्याकडे येतो त्यास ते खऱ्या शब्द–नामाच्या मार्गावर आणतात. आपल्याला समाजाचे विष बादलेले असते, म्हणून आपण वाद घालतो, परंतु महात्मा आपणांस या सर्व गोष्टींपासून स्वतंत्र करतात.''

महात्मा आपणांस प्रेमाने सांगतात की तुम्ही आमचे सांगणे ऐका. आपण ज्या समाजात, ज्या देशात व ज्या घरात जन्मला आहात, त्यांच्यापैकी कोणीही आपल्यासोबत जाणार नाही. इथपर्यंत की आपले शरीर देखील आपल्या सोबत जाणार नाही. ते देखील परके घर आहे, आपण त्यासदेखील येथेच सोडून जाणार आहोत. आपण आपल्या गृहस्थी जीवनाच्या जबाबदाऱ्या पार पाडत दररोज पहाटे उठून दोन–तीन तास शब्द–नामाच्या ध्यान–अभ्यासात व्यतीत करावेत व आपल्या घरी सचखंडास पोहचावे.

आपण ज्या **काळाच्या नगरीत** आलेला आहात, ते जन्म आणि मृत्युचे अशांत नगर आहे. जन्म नंतर होतो, मृत्यु अगोदर येऊन समोर उभा रहातो. अजून मृत्युपासून सुटकारा मिळालेला नसतो तितक्यात पुढचा जन्मरुपी पिंजरा तयारच असतो. एखाद्या कैद्याप्रमाणे बेड्या लागलेल्याच असतात. आपण विचार करून पहा! ज्या मनुष्यास रोज कोर्टात न्यायाधीशापुढे हजर केले जात असेल तर त्याची या संसारातही बेइज्जती होते व तो सदैव त्रस्त

राहतो, परंतु आपण स्वत:च ती स्थिती ओढावून घेतलेली असते. जेव्हा मृत्यु येतो तेव्हा यमदूत धरून धर्मराजासमोर हजर करतात. धर्मराज आपल्या चांगल्या व दुष्कर्मांना अनुसरून पुढला जन्म देतो. तेथे जाऊन आपण पुन्हा मृत्युचा सामना करतो. आपण जेथेही जाऊन जन्म घेतो तेथे सदैव राहू शकत नाही. जर आपण गेल्याजन्मी जमवलेल्या वस्तू याजन्मात आणू शकलो नाही, तर आपण याजन्मात जमा केलेल्या वस्तू आपल्या सोबत पुढे जातील असा विचार कसा बरे करू शकतो? कबीर साहेब सांगतात:

ऐसे घर हम बहुत बसाए, जब हम राम गर्भ होय आए।

यापूर्वी आपण अशी अनेक घरे वसविलेली आहेत. जेव्हा आपणांस पूर्वजन्मातील घरे, जाती, आई-वडील, पती-पत्नी आठवत नाहीत तर आज आपण कोणती आशा घेऊन बसलो आहोत, काय आपण त्यांना सोबत घेऊन जाऊ शकू? आपणांस मनुष्यजन्म हा मौल्यवान हिरा लाभलेला आहे, आपण त्यास आळस करून सांसारिक विषय-विकारांमध्ये व्यर्थ घालवू नये. गुरू अर्जुनदेवजी सांगतात:

दिवस गँवाया खेल के रात गँवाई सोए। हीरे जैसा जन्म है कौडी बदले जाए।।

गुरू अर्जुनदेवजींनी या जन्मास हिरा म्हणून संबोधलेले आहे. विषय-विकार कवड्या आहेत. मनुष्यजन्म मिळणे ही भाग्याची गोष्ट आहे. याजन्मात कमावून सोबत घेऊन नेण्यासारखी वस्तू म्हणजे 'शब्द-नाम' होय.

जग के बीच बँधे तुम ऐसे। जैसे सुवना नलनी धारी।

आपण आम्हांस अत्यंत प्रेमाने समजावता की आपण कशाप्रकारे या संसारात येऊन अडकलेलो आहोत. सर्वात आधी आपण तना-मनाच्या पिंजऱ्यात अडकलेलो आहोत, जे आजारपण आणि अडी-अडचणींचे भंडारगृह आहे. आपणांस कल्पना नसते की कधी कोणती अडचण आपल्यासमोर येऊन उभी राहील. आपण संसारात अशा प्रकारे अडकलेलो आहोत जसे पोपट पिंजऱ्यात अडकलेला असतो.

पोपटास पकडणाऱ्यांमध्ये ही कला असते की ते पाण्याच्या डबक्यावर लांब बारीक नळी लावून तेथे काही पेरू–मिरचीसारखे मोहक पदार्थ पोपटासाठी पसरवून ठेवतात. पोपट ते पदार्थ खाण्यासाठी त्या नळीवर बसतो. तो बसताच ते नळी फिरवितात तेव्हा पोपट उलटा होतो. पोपट आपल्या पायांनी पकडलेली नळी सोडण्यास तयार नसतो कारण खाली पाणी असते, त्यास वाटते मी पाण्यात पडलो तर बुडून मरेन. अशा स्थितीत ते त्या पोपटास अगदी सहज पकडतात व पिंजऱ्यात घालतात. मग ते त्यास आपली बोली शिकवितात. तो थोडावेळ फडफडतो परंतु नंतर त्यास पिंजरा आवडू लागतो व त्यास त्या पिंजऱ्याशी प्रेम जडते. शेवटी तो त्या पिंजऱ्यात टिकून बसतो. आपल्या आत्म्याची देखील हिच परिस्थिती आहे. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

सुहट पिंजर प्रेम का बोले बोलनहार। सच चुगे अमृत पिए उडे ते एको बार।।

ज्याप्रमाणे पोपट पिंजऱ्यावर प्रेम करून अनेक बोली बोलू लागतो. एकदा का पोपट उडला तर तो स्वतंत्र होऊ शकतो. आपले शरीर पिंजरा असून आपला आत्मा पोपट आहे. आत्मा शरीररूपी पिंजऱ्यावर प्रेम करून कधी कोणत्या समाजात तर कधी कोणत्या प्रांतात जन्म घेतो आणि तेथील बोली बोलू लागतो. जर त्याने सांसारिक रसांच्या स्वादाचा त्याग करून शब्द–नामाचे खाद्य चाखू लागला तर त्यास पुन्हा या दु:खी काळाच्या नगरीत हजेरी लावण्यास यावे लागणार नाही.

स्वामीजी महाराज अत्यंत सुंदर उदाहरण देऊन समजावतात की, आपण या संसारात अशाप्रकारे अडकलेला आहात जसे पोपट पिंजऱ्याशी प्रेम करून पिंजऱ्यात अडकलेला असतो. आपली परिस्थितीदेखील तशीच आहे.

मरकट सम तुम हुए अनाड़ी। मुट्ठी दीन फँसा री।।

आता आपण माकडाचे उदाहरण देऊन समजावता की ज्याप्रमाणे माकड पकडणारे एक निमुळत्या तोंडाचे भांडे घेऊन त्यास जमिनीत गाढतात.

त्या भांड्यात ते लाह्या घालून दूर जाऊन बसतात. त्या लाह्या पाहून माकडाच्या तोंडाला पाणी सुटते. लाह्या खाण्याची लालुच त्यास आवरत नाही व तो आपला हात त्या भांड्यात घालतो. जेव्हा तो भांड्यात हात घालतो तेव्हा हात बारीक असतो परंतु जेव्हा तो आपली मुठ लाह्यांनी भरतो तेव्हा तो हात भांड्यातून बाहेर काढू शकत नाही.

माकडास लालुच असते की माझ्या मुठीतील लाह्या भांड्यात राहू नयेत, मला सर्व लाह्या मिळाव्यात. तो खूप चीं–चीं करतो, रडतो–आरोळ्या ठोकतो, परंतु तो त्या लाह्या मुठीतून सोडण्यास तयार नसतो. माकड पकडणारे ही युक्ती वापरून अगदी सहजतेने माकडास पकडतात. मग माकडाच्या गळ्यात साखळी बांधून ते त्याच्याकडून घरोघरी भीक मागवितात. माकड त्यांच्या सांगण्यानुसार नाच करतो. माकडात केवळ एकच कमजोरी होती ती म्हणजे लाह्या खाण्याची लालुच.

आपणही लालुच वशात सांसारिक गोष्टींना घट्ट मिठी मारलेली आहे. जेव्हा पती मृत्यु पावतो तेव्हा पत्नीची काय दशा होते? तसेच पत्नी मरण पावल्यानंतर पतीची किती दुर्दशा होते? तरुण मुल वारले तर आई–वडिलांची किती केविलवाणी परिस्थिती होते? त्याचप्रमाणे लहान मुलाचे आई–वडील वारले तर त्याची किती दुर्दशा होते?

दिशाभूल झालेल्या आपल्या मनास त्या माकडाप्रमाणे कधी ठोकर लागत नाही की आता तरी आपण सांसारिक गोष्टींचा त्याग करून मनोभावे ध्यान–नामस्मरण करावे. महात्म्यांच्या सांगण्याचा अर्थ असा नाही की आपण मुले–बाळे सोडून जंगल–पर्वतांवर जाऊन लपावे. महात्मा आपणांस सांगतात की आपण गृहस्थी जीवनाच्या जबाबदाऱ्या पार पाडत ध्यान–नामस्मरण करावे. जंगला–पर्वतांवर कोण जातो? भगवे कपडे कोण परिधान करतो? जो घराच्या जबाबदाऱ्या सोडून पळतो, जो भ्याड व कमजोर हृदयी आहे. असे लोक अगोदर मुलांना जन्मास घालतात व नंतर इतरांना महात्मा

बनून दाखवतात की आम्हांस मुला–बाळांचा मोह नाही, आम्ही प्रेममुक्त आहोत. परंतु याचा तर अगोदर विचार करावयास हवा होता!

महाराज सावन सिंहजी सांगत असत की माझ्याकडे अनेक प्रकारचे लोक येतात. कोण विचारतो,''महाराजजी, मी लग्न करू का?'' मी सांगतो, ''बांधवा, ही तुझी मर्जी आहे. जर तू ही जबाबदारी निभावू शकत असलास तर आनंदाने लग्न कर.'' कोणी म्हणतो की,''मी लग्न करू इच्छित नाही.'' मी त्यास म्हणतो,''ही तुझी मर्जी आहे. जर तू लग्न केल्याशिवाय जीवन जगू शकत असलास व व्यभिचार करणार नसलास तर लग्न करू नकोस.''

जेव्हा पश्चिमेतील लोक दर्शनाच्या कार्यक्रमात मला भेटण्यासाठी येतात, तेव्हा त्यांचे बहुतेक प्रश्न अशाचप्रकारचे असतात. मी त्यांना महाराज सावन सिंहजींची हीच गोष्ट सांगतो की,''प्रियजनहो, तुम्ही नीट विचार करा. लग्न करून मुलं झाल्यानंतर जर त्यागी बनण्याचा प्रयत्न केलात तर त्या मुलांचे काय होईल? तुमची ध्यान–अभ्यासामार्फत आंतरिक प्रगती होणार नाही.''

बाह्यजगात आपल्या शरीरास अनेक गोष्टींची गरज असते. आपल्या शरीरास कपड्यांची गरज असते, अन्न–पाण्याची गरज असते, रहाण्यासाठी घराची गरज असते. आपल्यावर कुटुंबाची जबाबदारी पडेल म्हणून लग्न न करून नंतर इतरांच्या घरात डोकावण्यात किती मोठे शहाणपण आहे? प्रत्येक महात्म्याने व्यभिचार करण्यास मनाई केलेली आहे. त्यापेक्षा लग्न करणेच चांगले आहे. महात्मा सांगतात आपण दु:खी आहोत, तळमळत व कण्हत देखील आहोत, परंतु आपण या गोष्टी सोडण्यास तयार नसतो.

उद्धोने कृष्ण भगवानास विचारले,''तुमचे स्वर्ग–वैकुंठ खूप चांगले आहेत आणि आपण अत्यंत दयाळू आहात तेव्हा तुम्ही जगातील सर्व जीवांस स्वर्गात जागा द्या.'' कृष्ण भगवान म्हणाले,''हे बघ उद्धो, माझ्या अंत:करणात या सर्व जीवांसाठी खूप जागा आहे, परंतु कोणीही येथे येण्यासाठी तयार नाही.'' उद्धो म्हणाला,''मी कसे मानू की एखाद्या व्यक्तीस स्वर्गात येण्यासाठी

सांगितले गेले असता त्याने स्वर्गात येण्यास नाकारले?'' तेव्हा कृष्ण भगवान म्हणाले,''तू जितक्या लोकांना घेऊन येशील मी त्या सर्वांना येथे स्वर्गात जागा देईन.''

उद्धोने विचार केला डुकराची योनी सर्वात निकृष्ठ योनी आहे. डुक्कर दिवसभर घाणीत आपले तोंड घालून बसलेले असते. मी त्यास स्वर्गाचे आमंत्रण का देऊ नये? हे तर पुण्याचे काम आहे.'' उद्धोने डुकरास सांगितले,''मी तुला स्वर्गात घेऊन जाऊ का?'' डुकराने त्यास विचारले,''तेथे विष्टा-घाण आहे का?'' उद्धो म्हणाला,''नाही.'' डुक्कर म्हणाला,''जेथे विष्टा-घाण नाही अशा स्वर्गाचा काय फायदा?'' मग डुकराने विचारले,''तेथे पिल्ले आहेत का?'' उद्धो म्हणाला,''अशी बंधने निर्माण करण्याचा स्वर्गात काय फायदा?'' त्यावर डुक्कर म्हणाला,''एखादा मुर्खच तुझे सांगणे ऐकून स्वर्गात येईल. मी तर येण्यास तयार नाही.''

उद्धो अत्यंत खेदाने कृष्ण भगवानकडे आला. कृष्ण भगवानने त्यास विचारले,''तू एकटाच आलास, कोणासही सोबत आणले नाहीस?'' उद्धो म्हणाला,''हे जग फार दु:खांनी भरलेले आहे, रडत व तळमळत आहे परंतु कोणीही जग सोडू इच्छित नाही.'' स्वामीजी महाराज देखील हेच सांगत आहेत की आपली हालत देखील त्या माकडाप्रमाणे आहे.

और मीना जीह्वा रस माती। काँटा जिगर छिदा री।।

आता आपण एका पाण्यात रहाणाऱ्या माशाचे उदाहरण देत आहात. मासा त्याच्या स्वादरसाच्या आहारी गेलेला असतो. मच्छीमार लोकं मासेमारी करण्यासाठी वापरणाऱ्या गळाच्या आकड्यास मांसाचा तुकडा अडकवितात आणि तो पाण्यात सोडतात. माशास मांस खाण्याची चटक असते, तो लागेच मांस खाण्यासाठी झडप मारतो व गळाचा आकडा माशाच्या घशात अडकतो. स्वत:ची गळातून सुटका करण्याचा प्रयत्न करीत असता गळाची दोरी ताणली जाते. मासा गळामध्ये फसला आहे याची जाणीव झाल्यावर

मच्छीमार त्यास लगेच पाण्याबाहेर खेचून काढतात. मासेमारी करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या जाळ्यामध्ये मोठमोठ्या मगरीदेखील कधीकधी अडकतात ज्या अख्ख्या मनुष्यासही गिळू शकतात. त्या माशामधील एका लहानशा स्वादरसाच्या कमजोरीमुळे मच्छीमार लोकं त्यास पकडून त्याचे तुकडे–तुकडे करून ते विस्तवावर शिजवतात. अशा तऱ्हेने जीभेच्या स्वादापोटी माशास त्याचे प्राण गमवावे लागतात.

गज सम मूरख हुए इस बन में। झूठी हथनी देख बँधा री।

स्वामीजी महाराज उदाहरण देत आपणांस समजावतात की हे जग निव्वळ विषय–विकारांचे जंगल आहे. वेड्या लोकांप्रमाणे आपले मन या जगामध्ये भरकटत राहते. काम मनुष्य तसेच पशु–पक्ष्यांनादेखील वेडे बनवून टाकते. हत्ती अतिशय शक्तीमान प्राणी आहे. हत्तीस पकडणारे शिकारी जमिनीत खूप खोल खड्डा खणतात व त्या खड्ड्यास पाला–पाचोळ्याने आच्छादतात. त्यावर एक कागदी हत्तीण बनवून उभी करतात. जेव्हा कामरूपी वेडेपणाचा झटका एखाद्यास येतो, तेव्हा त्यास शेजारी उभा असलेला मनुष्यही दिसत नाही. त्यामुळे कामाच्या आहारी गेलेल्या हत्तीस ती कागदी हत्तीण खरीच भासू लागते.

कबीर साहेब सांगतात कामी बेशरम बनतो, त्यास कसलीही लाज वाटत नाही. त्या हत्तीस कागदी हत्तीण आणि खरी हत्तीण यामधला फरकही जाणवत नाही. किरकोळ आच्छादन तुटून तो खड्ड्यात पडतो, जेथे त्यास अनेक दिवस उपाशी राहवे लागते. नंतर माहूत त्यास अंकुशाचा मारा करीत पकडतात व कायम त्यावर बसून फिरतात. खरेतर हत्ती किती शक्तीमान प्राणी आहे, परंतु कामाच्या आहारी गेल्याने त्याची अवस्था बिकट बनते.

क्या क्या कहूं काल अन्याई। बहुविधि तुमको फाँस लिया री।

स्वामीजी महाराज सांगतात मी आणखीन कोण–कोणती उदाहरणे तुम्हांस देऊ? अन्यायी काळाने तुम्हांस अडकवून ठेवलेले आहे. माशामध्ये

स्वादरसाचा दोष आहे, तर हत्तीमध्ये कामाग्नीचा दोष आहे. त्यांनी त्यांच्यामधील एक–एका दोषामुळे स्वत:स दु:खामध्ये अडकवून घेतलेले आहे. मनुष्यामध्ये तर निरनिराळे पाच दोष आहेत. मग त्याचा बचाव सहजतेने होईल अशी अपेक्षा कशी बरे करू शकतो? परंतु याचा अर्थ असाही होत नाही की आजवर कुणीही बचावलेले नाही. जो कुणी बचावला आहे, तो केवळ शब्द–नामाची कमाई करूनच बचावलेला आहे. महात्मा रविदास सांगतात:

मृग मीन भृंग कुंचर एक दोख विनाश। पंच दोख असाध जामे ताकी के तक आस।।

मी सांगत असतो की काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार यांची स्थुल गाठ आपल्या दोन्ही नेत्रांमागे सुक्ष्म त्रिकुटीमधील ब्रह्मस्थानात आहे. आपला आत्मा जेव्हा या पातळीच्या वर पारब्रह्मात पोहचतो, तेव्हा त्याच्यावरील स्थुल, सुक्ष्म आणि कारण ही तिन्ही आवरणे गळून पडतात, तेथे या गोष्टींचा लवलेशही नसतो. तेथे फक्त प्रेमच आहे कारण तो देशच प्रेमाचा आहे. जोपर्यंत तो पर्वत पार करून आपण पुढे जात नाही, तोपर्यंत आपण या विकारापासून कसे बचावू शकू? परंतु जर का असे कुणी ढोंग रचून सांगत असेल की मी या पाच विकारांपासून परावृत्त झालेलो आहे, तर त्यास तुम्ही विसरून जा. कारण त्याचे मन त्यास कधी फसवेल याची कुणासही कल्पना नसते.

जोपर्यंत आपण हिंदुस्थानात आहोत, तोपर्यंत आपणांस हिंदुस्थानातील कायद्यांचे पालन करावे लागते. जेव्हा हिंदुस्थान सोडून दुसऱ्या कोणत्या देशात जातो, तेव्हा तेथील सरकारच्या नियम–कायद्यांचे पालन करणे आपल्यावर बंधनकारक असते. याचप्रमाणे जोपर्यंत आपण **काळाच्या नगरी**मध्ये राहात आहोत, तोपर्यंत काळाने आपल्यावर विषय–विकार लादलेले असतात. कधी आपल्या चारित्र्यावर डाग लागेल, काय कल्पना? दयाळू परमात्म्याच्या देशापर्यंत हे पाच डाकू पोहचू शकत नाहीत. त्यामुळे तेथे पोहचल्यानंतरच आपण या पाचही विकारांपासून परावृत्त आहोत असा दावा करू शकतो. परंतु महात्मा येथे पोहचूनही तसा दावा करीत नाहीत.

महाराज सावन सिंहजी एका महात्म्याची गोष्ट सांगत असत की तो एका गावामध्ये नेहमी जात असे. त्या गांवामधील एक स्त्री नेहमीच त्यांना डिवचत विचारीत असे की, ''तुमच्या चेहऱ्यावर दाढी आहे की झाडी आहे?''

महात्मा अतिशय समंजस होते. ते ध्यान–अभ्यास करून अंतर्यात जात असत, ते शांतीस्वरूप होते. जेव्हा कधी महात्मा तेथून जात असत, तेव्हा त्यांना ती स्त्री नेहमीच प्रश्न विचारी की, दररोज तुम्हांला मी हा प्रश्न विचारते, परंतु त्याचे तुम्ही उत्तर न देता निघून जाता? त्यावेळी महात्मा तिला म्हणत, योग्य वेळ आल्यावर तुला उत्तर देईन.

त्या महात्म्याचा अंत:समय समिप आला असता, त्यांनी स्वत:ची चिता तयार करविली आणि त्यांना नेहमी प्रश्न विचारणाऱ्या स्त्रीला एका शिष्याकरवी बोलावणे धाडले, जेणेकरून तिच्या प्रश्नाचे उत्तर देऊन जावे. तिला असे वाटू नये की महात्म्याने माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही.

ती स्त्री तेथे आली व तिने विचारले,''महात्माजी, आज तुम्ही माझी आठवण का काढलीत?'' महात्मा म्हणाले, ''मुली! तू दररोज मला विचारीत असे की माझ्या चेहऱ्यावर दाढी आहे की झाडी?'' आज मी तुझ्या प्रश्नाचे उत्तर देतो की, मी चितेवर बसलेलो असून, काही वेळातच चितेस अग्नी दिला जाईल. थोड्या वेळातच माझा श्वासोच्छ्वासही थांबणार आहे. आज मी माझी दाढी नि:ष्कलंक घेऊन जात आहे.'' महात्मा बढाया मारीत नाहीत. परमात्म्याच्या दरबारात पोहचूनही, मनाच्या सत्यस्वरूपाचे आकलन त्यांना झाले असल्याने ते आपणांस सांगतात की तुम्ही या पाच डाकूंपासून सांभाळून रहा, नामाची कमाई करा.

तुम अनजान मर्म नहिं जाना। छल बल कर इन फाँस लिया री।।

आपण सांगत आहात की या **काळाच्या नगरी**मध्ये निरनिराळ्या रितीने आपली फसवणूक केली जाते. काळाने जिवांना येथे अडकवून ठेवलेले आहे. या जगाबद्दल आपण अज्ञानी आहोत. या जगाची आपणांस काहीच माहिती

नाही. आपल्या आई–वडिलांकडून आपणांस थोडीफार माहिती कळते की ही आपली आई आहे, ही आपली बहिण आहे, हा आपला भाऊ आहे आणि जगात आपण कसे वावरायचे आहे? परंतु आपले आई–वडिलदेखील संसारी जीव असल्याने, त्यांनाही खरे ज्ञान नसते की आपण या विषय–विकारांच्या जंजाळातून कसे बाहेर पडावे? या **काळाच्या नगरीत** किती वाईट गोष्टी आहेत ज्या आपण अमलात आणू नये.

छूटन की विधि नेक न मानो। क्यों कर छूटन होय तुम्हारी।।

शांत मनाने तुम्ही विचार करा की या पाच डाकूंपासून स्वत:ची सुटका करून घेण्याचा मार्ग संत आपणांस सांगतात, तरीही त्यानुसार आपण वागत नाही. मला प्रेमीजन भेटण्यासाठी येतात, तेव्हा त्यांची दु:खे मला सांगतात. त्यावर उपाय म्हणून त्यांना मी एकच औषध सांगतो:

संसार रोगी नाम दारू मैल लगे सच बिना।

सर्व दु:खांचे निवारण करणारे नाम हे एकच औषध आहे. या विकारांपासून सुटकारा मिळविण्याचा जो मार्ग आहे, त्याचा तुम्ही अवलंब करीत नाही. प्रेमी एकच उत्तर मला देतात की ध्यान–अभ्यास करणे मला जमत नाही.

महाराज सावन सिंहजी देखील सांगत असत, ''जे लोक असे म्हणतात की ध्यान–अभ्यास करणे आम्हाला जमत नाही, ते स्वत:वरच खूप अन्याय करवून घेत असतात. आपण जर या जगातील अन्न खाऊ शकत असू तसेच मन–इंद्रियांची सर्व कामे करीत असू तर आपल्या स्वगृही पोहचण्याचे काम का बरे करू शकत नाही?'' गुरू नानकदेवजी सांगतात:

बुरे काम को उट खलोया, नाम की बेला पै पै सोया।

स्वामीजी महाराज सांगतात, ''आपणांस जर निंदा करायची असेल, विषय–विकारांचा अवलंब करायचा असेल तर आपली झोपच पळून जाते. नामाचा जप करायचा असेल तर ते टाळण्यासाठी मात्र खूप कारणे शोधून

काढतो. आपण विचार करतो की रात्र मोठी आहे, नंतर नामाचा जप करू. ध्यान–अभ्यासासाठी बसलो असताना, आपण झोपी जातो. मग तक्रार करतो की ध्यान–अभ्यास करणे जमत नाही.

सतगुरू सन्त हुए उपकारी। उनका संग करो न सम्हारी।।

या जगात महात्मा परोपकार करण्यासाठी येतात. ते आपणांस शब्द–नामाशी जोडतात परंतु आपण त्यांच्या सान्निध्यात केवळ देखावा करण्यासाठीच येतो. सत्संगात गेल्यानंतरही आपण आजूबाजूस पाहत राहतो. खरे तर ज्या रितीने सत्संगास बसणे आपणांकडून अपेक्षित असते, तसे आपण बसत नाही. महाराज सावन सिंहजी सांगत:

हथ कार वन्नी दिल यार वन्नी।

सत्संगामध्ये येऊन एक तास शांत बसून आपण तो ऐकावा व त्यामध्ये सांगितल्या गोष्टीचा स्वत:वर अवलंब करावा. महात्मा सत्संगामध्ये ठामपणे काय सांगत आहेत? ते ऐकावे. तेथे आपल्यामध्ये असलेल्या कमतरतांचे आपणांस ज्ञान होते, ज्या कमतरता आपण दूरही करावयास हव्यात. मनुष्यामध्ये मोजकेच अवगुण असतात. आपण एका सत्संगामध्ये एक अवगुण व दुसऱ्या सत्संगामध्ये दुसरा अवगुण, अशारितीने जर अवगुणांचा त्याग करू लागलो, तर काही दिवसांमध्ये आपल्या सर्व अवगुणांचा नाश होऊ शकतो. परंतु आपली अवस्था एखाद्या घाण्यास जुंपलेल्या बैलाप्रमाणे असते, जो एकाच खोलीत पन्नास मैलांचे अंतर चालतो. स्वामीजी महाराज सांगतात:

आगे पाछे बहु पछताऊं समय पड़े पर होवत चोरा।

या जगामध्ये येऊन सतगुरू नामाचे महात्म्य सांगतात. आपल्या हिताच्या गोष्टी ते सांगतात. परंतु सत्संगास येताना आपण श्रद्धाभावाने येत नाही. आपली अवस्था अशी आहे:

पत्थर पाणी लेखा वरता।

एखाद्या दगडास तुम्ही कितीही वेळ पाण्यात बुडवून ठेवा, पण त्यामध्ये पाणी काही शिरत नाही. याचप्रमाणे आपण कितीही सत्संग ऐकले, परंतु जोपर्यंत त्यावर आपण अंमल करत नाही, त्यानुसार वागत नाही, तोपर्यंत त्या सत्संग ऐकण्याचा काय उपयोग?

प्रियजनहो, माझ्या आत्म्याचे परमात्मा सतगुरू माझ्या आश्रमामध्ये येण्यापूर्वी काही दिवस अगोदर माझे काही नातेवाईक माझ्याकडे आले. त्यांच्या घरी विवाहाचा कार्यक्रम होता. ज्याप्रमाणे जंगम लोकं घरामध्ये येऊन घंटानाद करतात, त्याचप्रमाणे येऊन दारात उभे राहून त्यांनी त्यांची भांडी वाजवली आणि 'सतनाम वाहेगुरू' अशा घोषणा दिल्या.

मी वर गच्चीत उभे राहून कोण आले आहे ते पाहू लागलो. त्यांना बोलावून मी विचारले, ''तुम्ही लोकांनी एवढा त्रास का करून घेतला?'' त्या नातेवाईकांनी त्यांच्या सर्व अडी-अडचणी व गरजा माझ्यासमोर मांडल्या. कशीबशी मी त्यांच्यापासून स्वत:ची सुटका करवून घेतली.

त्यानंतर काही दिवसांनी महाराज कृपाल माझ्या आश्रमामध्ये आले. सर्वात अगोदर त्यांनी मला विचारले, ''बोल बंधु! तुझ्या ध्यान-अभ्यासाची काय परिस्थिती आहे?'' त्याकाळी मी 'दोन-शब्दांचा' ध्यान-अभ्यास करीत होतो. मला जमिनीखाली गुहेत बसून ध्यान-अभ्यास करीत असता साधारण अठरा वर्षे झाली होती. रात्रं-दिवस मी प्रार्थना करीत असे की सतगुरू जेथे कोठे तुम्ही असाल, कृपा करून मला भेटा. त्यांनी माझ्या हृदयाची हाक ऐकली. गुरू नानकदेवजी सागंत असत:

बिन बोलया सब कुछ जाणंदा, किसपे करिए अरदास।

खरेतर, मोठ-मोठ्या प्रार्थना करणे म्हणजे सूर्याला दिवा दाखवण्यासारखे असते. तुमच्या अंतरामध्ये शब्द-स्वरूपी सतगुरू बसलेले आहेत. त्यांना तुमच्या प्रत्येक गरजेचे ज्ञान असते. त्यांनी आल्या-आल्या जेव्हा माझ्या



ध्यान–अभ्यासाबद्दल विचारले की, तुझे कसे चालले आहे? त्याकाळी मला कविता करण्याची सवय होती. मी त्यांना म्हणालो:

आए लक्खां ही परौणें पर ऐसा कोई आया ना।
आपो आप सब दस्सी किसे भजन कराया ना।
गौंदे तुर गए सब अपने ही गौंणे।
भाग जागे साडे वीर नूं साडे आए ने सन्त परौंणे।।

प्रत्येक जण येऊन आपआपल्या गरजा मला सांगतो, परंतु कुणीही ध्यान–अभ्यासाचा उल्लेखही केला नाही. अंत:करणापासून आपण सतगुरूंना शरण जावयास हवे. जे काही ते आपणांस सांगतात, ते आपल्या भल्यासाठीच असते. त्यावेळी अनेक लोकं महाराजजींच्या आजुबाजूस फिरत असत, जेणेकरून त्यांचा महाराजजींसोबत फोटो यावा. परंतु माझ्यासाठी त्यांचा आदेश होता की,''मी स्वत: तुझ्याकडे येईन. तू तुझा ध्यान–अभ्यास करीत रहा.'' ही त्यांची कृपा होती की ते नेहमी दिलेल्या वचनानुसार येत असत.

जे लोक त्यांच्या कृपेस समजू शकले नाहीत, ते म्हणू लागले की आम्ही महाराजजींच्या ड्रायव्हरला विचारले तेव्हा समजले की आजारपणात ते येथे माझ्या आश्रमात गेले नाहीत. मी हसून म्हणालो,''तुम्ही ड्रायव्हरच्या मदतीने फिरणाऱ्या गुरूस शोधले आहे, परंतु मला लाभलेले गुरू कुणा ड्रायव्हरच्या मदतीने फिरत नाहीत. ते शब्द–स्वरूपी आहेत. ते सर्वांचे अंतरंग जाणतात. कुणीही अंत:करणापासून त्यांना हाक मारा, मग ते कसे येतात पहा!''

वे दयाल अस जुगत लखावें। कर दे तुम छुटकारी।।

सतगुरू कृपाळू पुरुष असतात. ते केवळ कृपा करणेच जाणतात. त्यांच्याकडे सदैव इतरांप्रती दया असते. ते नामाचे महात्म्य सांगतात, ज्यामुळे तुमची काळाच्या नगरीतून सुटका होईल. गुरू नानकदेवजी सांगतात:

सतगुरू दया का रूप है जिसनूं दया दया सदा होय।

पाँच तत्त्व गुन तीन जेवरी। काटें पल पल बंधन भारी।।

आपले शरीर पाच तत्त्वांनी बनलेले आहे. त्यामध्ये सतोगुण, रजोगुण आणि तमोगुण आहेत. ज्या बंधनामध्ये आपण जखडले गेलेलो आहोत, त्या बंधनापासून आपली 'शब्द–नामाची' कमाई केल्यानेच सुटका होऊ शकते.

उनकी संगत करो भर्म तज। पावो तुम गति न्यारी।।

सत्संगामध्ये बसताना तुमच्या हृदयातील सर्व भ्रम दूर करून बसा. ते आपणांस जेथे पाठवितात तेथे तुम्ही जा. तुमची गती आणि मती निराळीच बनेल. तुमच्या अंतरात प्रभुची आठवण आपोआपच उफळून येऊ लागेल.

जगत जाल सभ धोखा जानो। मन मुरग संग कीन्ही यारी।।

आत्म्यास फसविण्यासाठीच काळाने या जगाची रचना केलेली आहे. आपले मूर्ख मन काळाचा एजंट असून ते आपली सतत फसगत करीत असते.

इसका संग तजो तुम छिन छिन। नहिं यह लेगा जान तुम्हारी।।

क्षणोक्षणी तुम्ही मनावर पहारा ठेवा, त्याच्यावर लक्ष ठेवा. त्याच्यापासून तुम्ही बेफिकीर होऊन त्याकडे दुर्लक्ष करू नका. नाहीतर तुम्हांस कळणारही नाही की ते तुम्हांस कधी कोणत्या जाळ्यामध्ये अडकवून टाकेल?

अपने घर से दूर पड़ोगे। चौरासी के धक्के खा री।।
बड़ी कुगति में जाए पड़ोगे। वहाँ से तुम को कौन निकारी।।
तां ते अब ही कहना मानो। राधास्वामी कहत विचारी।।

आपण सांगत आहात,''मनुष्य–जन्म आपणांस परमात्म्याच्या सान्निध्यात जाण्यासाठी, सचखंडामध्ये पोहचण्यासाठी लाभलेला आहे. परंतु जर आपण मनाची संगत केली तर, आपण आपले खरे घर, सचखंडापासून दुरावू, चौऱ्याऐंशी लक्ष योनींच्या चक्रनेमीक्रमामध्ये अडकून पडू, जेथे दु:खच दु:ख आहे, संकटेच–संकटे आहेत.''

***

कृपावंत महात्मा

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे लहान मुलांच्या कार्यक्रमामधील गोष्टीरूपात दिलेला संदेश

एक अध्यात्मिक कमाई करणारे महात्मा होते. प्रेमींच्या निमंत्रणामुळे ते घराबाहेर पडले. त्याकाळी प्रवासासाठी आजच्यासारख्या बस–गाड्या उपलब्ध नव्हत्या. साधारणत: महात्मा पायीच प्रवास करीत असत. घरातून निघताना त्या महात्म्यांनी सोबत शिदोरी म्हणून तीन पराठे बांधून घेतले. वाटेत त्यांना एक लोभी माणूस भेटला. तो देखील त्यांच्यासोबत जाऊ लागला.

त्या मनुष्याच्या मनात विचार आला की या महात्म्यांजवळ थोडे–फार तरी पैसे नक्की असतील. थोडे पुढे गेल्यावर वाटेत एक पाण्याचा कालवा लागला. महात्मा त्या मनुष्यास म्हणाले, ''बंधु! मला देहक्रियेसाठी जायचे असून, तू माझ्या सामानावर लक्ष ठेव.'' तो लोभी मनुष्य म्हणाला,''ठिक आहे! मी लक्ष ठेवतो.''

महात्मा दूर गेल्यावर पैशांच्या लालसेने त्याने महात्मांचे सामान तपासून पाहिले. त्यास पैसे काही सापडले नाहीत, परंतु तीन पराठे मात्र दिसले. त्या लोभी मनुष्याने त्यापैकी एक पराठा खाऊन टाकला. परतल्यावर महात्मांनी आपले सामान पाहिल्यावर त्या मनुष्याने एक पराठा खाल्ल्याचे महात्म्यांच्या लक्षात आले. महात्म्यांनी त्या मनुष्यास विचारले, ''बांधवा! यामधून एक पराठा तू खाल्लास का?'' तो मनुष्य म्हणाला, ''नाही.''

महात्मा त्यास म्हणाले, ''तुला जन्म देणाऱ्या परमात्म्याची आठवण कर आणि त्याची शपथ घेऊन सांग की, तू पराठा खाल्लेला नाहीस.'' तो लोभी मनुष्य म्हणाला, ''परमात्म्याची शपथ घेऊन सांगतो की, मी पराठा खाल्लेला नाही.'' ते ऐकून महात्मा शांत बसले. महात्म्यांनी उरलेल्या दोन पराठ्यांपैकी एक पराठा स्वत: खाल्ला आणि दुसरा त्या लोभी मनुष्यास खाण्यासाठी दिला.

पुढे वाटचाल करीत असताना ते दोघे एक नदी पार करू लागले. तो लोभी मनुष्य नदीत बुडू लागला. महात्मा त्यास म्हणाले,''हे बघ सद्गृहस्था! आपणांस जन्मांस घालणाऱ्या परमात्म्याचे स्मरण कर, तो प्रत्येक मनुष्यास मदत करीत असतो.'' लोभी मनुष्याने त्यानुसार परमात्म्याचे स्मरण केले आणि तो बुडण्यापासून वाचला. महात्मा म्हणाले, ''हे बघ! परमात्म्याने आपणांस किती मदत केलेली आहे, आपणांस बुडण्यापासून वाचविले आहे. अशा परमात्म्यास साक्षी मानून म्हण की तू पराठा खाल्लेला नाहीस.'' तो लोभी म्हणाला, ''त्याच परमात्म्याची शपथ घेऊन सांगतो की, मी पराठा खाल्लेला नाही.'' त्यावर महात्मा शांत राहिले.

पुढे जात असताना जंगलामध्ये वणवा पेटलेला त्यांना आढळला. त्यापासून त्यांचा बचाव होणे अशक्य होते. महात्मा म्हणाले, ''हे बघ! आपणांस जन्म देणाऱ्या परमात्म्याचे स्मरण कर. या आगीपासून तोच आपले रक्षण करू शकतो.''

लोभी मनुष्याने त्यानुसार परमात्म्याची आठवण केली. परमात्म्याने त्याचे रक्षण केले. त्या जंगलातून पुढे जात असताना महात्मा म्हणाले, ''हे बघ बंधू! परमात्म्याने खूप मोठी कृपादृष्टी करीत आगीपासून आपले रक्षण केलेले आहे. त्याच परमात्म्याची शपथ खाऊन सांग की तू पराठा खाल्लेला नाहीस.'' त्या लोभी मनुष्याने पुन्हा त्याप्रमाणे शपथ घेतली. आपण संसारी लोकं अशीच आहोत:

अगरचे अल्लाह सबका अन्नदाता है फिर भी हर शख्स अल्लाह को पतियाता है।
अल्लाह का कोई शुक्रगुजार नहीं, अल्लाह सिर्फ कसम खाने के काम आता है।।

हे जग केवळ शपथ घेऊन आपली गोष्ट खरी सिद्ध करण्यासाठीच परमात्म्याची आठवण करीत असते. ते महात्मा अतिशय समंजस आणि पारमार्थिक कमाई करणारे होते. त्यांनी विचार केला की, जोपर्यंत असत्य बोलण्याची सवय या माणसाची सुटणार नाही, तोपर्यंत हा परमात्म्याच्या दरबारामध्ये जाऊ शकणार नाही. त्या मनुष्याची असत्य बोलण्याची सवय सुटावी, हाच हेतू त्या महात्म्यांचा होता.

मायावी शक्तीने त्या महात्मांनी तेथे सोन्याचा ढिग तयार केला. त्या ढिगाच्या तीन वाटण्या करीत महात्मा त्या लोभी मनुष्यास म्हणाले, ''एक ढिग माझा, दुसरा तुझा आणि तिसरा ढिग पराठा खाणाऱ्या मनुष्याचा.'' तो लोभी मनुष्य लगेच म्हणाला, ''ज्या परमात्म्याने आपणांस जन्मांस घातले आहे, आपले नदीत बुडण्यापासून रक्षण केले आहे आणि आगीपासून रक्षण केले आहे, त्या परमात्म्याची शपथ घेऊन सांगतो की, तो पराठा मीच खाल्लेला आहे.''

त्यास समजावणे हाच त्या महात्म्यांचा हेतू होता. महात्म्यांनी विचारले, ''हे तू अगोदरच मान्य का केले नाहीस?'' सर्वांना माफी देण्यासाठीच महात्मा या जगात येतात. सत्य अखेरपर्यंत सत्यच असते.

***



प्रश्नोत्तरे

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे
संतबाणी आश्रम, १६ पी. एस. राजस्थान

एक प्रेमी : प्रिय संतजी! स्वामीजी महाराज हुक्कापान का करीत असत? हुक्कापान करणे जर अयोग्य नसेल, तर हे वाचणाऱ्या सर्व वाचकांचा असाच समज होऊ शकतो की संतमतामध्ये हुक्कापान करणे वर्ज्य नाही.

बाबाजी : सर्वप्रथम ही गोष्ट समजून घ्यावी की, समर्थ पुरुषांमध्ये कोणतेही दोष नसतात. ते निर्दोष असतात. स्वामीजी महाराजांनी त्यांच्या वाणीमध्ये आपणासाठी नाम जपण्याचा उपदेश केलेला आहे, हुक्कापान करण्याचा नाही. संत असा काही–ना–काही चमत्कार करतात, जेणेकरून त्यांना हवे असलेले आत्मे त्यांच्याकडे आकर्षित होतात आणि त्यांना नको असलेले आत्मे दूर जातात. एखादा जीव जेव्हा संतांना शरणी येतो, तेव्हा संत त्या आत्म्यांच्या कर्मांचा परिक्षणार्थी अभ्यास करतात की याच्यावर काळाचे किती ओझे आहे?

स्वामीजी महाराज आगरा शहरात राहत होते. तेथे खूप जनसंख्या होती. प्रेमीजन लंगर तयार करीत असत. फुकटे लोकं नामाचा जप करीत नसत, ना सत्संग श्रवण करीत असत, तेथे येऊन ती लोकं लंगरमधील अन्न ग्रहण करून अवास्तव गप्पा मारीत असत. संत नेहमीच त्यांच्या सेवकांचे हित चिंतीत असतात. त्यामुळे स्वत:च्या होणाऱ्या निंदेची ते तमा बाळगत नाहीत. खरेतर निंदा संतांच्या दरबाराचा पहारा करीत असते. संत कोणत्याही मनुष्यास पहारेकरी न ठेवता निंदेची पहारेकरी म्हणून नेमणूक करतात.

स्वामीजी महाराजांनी एकदा आपल्या मुखामध्ये पाणी घेऊन ते लंगरमधील अन्नावर टाकले, वास्तविकत: ते अन्न प्रेमींसाठी प्रसाद बनले. आज आम्हाला शीतल प्रसाद लाभला, आमच्या अनेक कर्मांचे ओझे आज

नष्ट होईल, असा विचार प्रेमींनी केला. परंतु फुकटे व स्वादुजन म्हणाले की, यांचे उष्टे अन्न आम्ही का खाऊ? तेव्हापासून असा गवगवा झाला की, ते लोकं अन्नामध्ये थुंकतात.

बरीच लोकं महाराज सावन सिंहजींनादेखील हाच प्रश्न विचारीत असत. परंतु कधीच अन्नावर थुंकून ते अन्न कुणास खाण्यासाठी दिले जात नाही. परमात्म्यास प्रार्थना केली जाते की, तुझा शितल प्रसाद तयार आहे. तो तू ग्रहण करण्यालायक असो, सर्व संगतला तुझा प्रसाद लाभो. परंतु तो गैरसमज अजूनही लोकांमध्ये आहे.

मी या अगोदर राहत असलेल्या गावात, एका माणसाला मद्यप्राशन करण्याची सवय होती. त्याची पत्नी त्यास वारंवार समजावत असे की त्याने महाराज कृपालजींकडून नामदान घ्यावे. त्या माणसाने विचार केला की, नामदान घेण्यासाठी मी जर गेलो, तर मला मद्यपान सोडून द्यावे लागेल. त्याने त्याच्या पत्नीस माझे (बाबाजींचे) उदाहरण दिले की त्याने नामदान घेतल्याने त्यास त्याचे घरदार सोडावे लागले. मीदेखील घरदार सोडून द्यावे, अशी तुझी इच्छा असल्यास मी नामदान घेतो.

स्वामीजी महाराजांनी त्यांच्या पुस्तकात नामाबद्दल सचखंडाबद्दल आणि सत्गुरुंच्या मोठेपणाबद्दल करोडो गोष्टी लिहिलेल्या आहेत, त्या गोष्टींवर तुम्ही लक्ष द्या. स्वामीजींसारखे बनून तुम्ही तुमच्या मर्जीनुसार काहीही करा. ज्या सत्संगी लोकांना स्वत:ची हुक्कापान करण्याची सवय दडवायची असते, ते स्वत:चा दुर्गुण लपविण्यासाठी अशा गोष्टींची चर्चा करतात. सत्संगी नसलेली लोकं हुक्कापान करणाऱ्या सत्संगींना जेव्हा विचारतात की, संतमतात असूनही तुम्ही हुक्कापान का करता? तेव्हा स्वत:चे व्यसन दडविण्यासाठी ते म्हणतात की, स्वामीजीदेखील हुक्कापान करीत असत. महाराज सावन सिंहजी सांगत असत, ''असे लोक एक खोटं दडविण्यासाठी आणखी लाख खोटं बोलतात.'' स्वामीजी महाराज सांगतात:

गुरू की करनी काहे धाओ, गुरू कहया सो कार कमाओ।

हे महान आत्मे निर्दोष असतात. ते मुडद्यासही जिवंत करू शकतात. परमात्म्याने त्यांना अथांग शक्ती दिलेली असते. त्यांची बरोबरी आपण कसे काय करू शकणार?

एकदा गुरू गोविंद सिंहजी आपल्या मालवा विभागात आले. तेथे एक पांढरे गिधाड बसलेले होते. त्यांनी त्या गिधाडास ठार मारले. काही प्रेमींनी विचारले की,''महाराजजी! तुम्ही त्या निर्दोषाची हत्या का केली?'' गुरू गोविंद सिंहजी म्हणाले,''तुम्ही जाऊन पहा की त्यास एकच डोळा आहे. एके काळी हा राजा होता. सत्तेच्या नशेमध्ये याने एका मुलीचा सत्वभंग केला. ती मुलगी म्हणाली, ''तू घाण खातोस आणि घाणच खात राहशील.'' साधारणत: हे जनावर घाण खाण्यातच आनंदी आढळते. त्यावेळी घाबरून राजाने त्या मुलीस विचारले, ''यातून माझा उद्धार कसा होईल?'' ती मुलगी म्हणाली,''तू जेव्हा एखाद्या परिपूर्ण संत-सत्गुरूंच्या दृष्टीक्षेपात येशील, तेव्हा ते तुझा उद्धार करतील.'' गुरू गोविंद सिंहजी म्हणाले की, आज हा माझ्या नजरेस आला, त्यामुळे मी त्याचा उद्धार केलेला आहे. सेवकांनी जेव्हा जाऊन पाहिले तेव्हा खरोखरच त्यास एकच डोळा होता.

***

धन्य अजायब

परम संत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील
अहमदाबाद शहरातील तसेच राजस्थानातील सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती

अहमदाबाद येथे **७, ८ आणि ९ जुलै २०१७** रोजी निम्नलिखित पत्त्यावर सत्संगाच्या कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे.

श्री देशी लोहाणा विद्यार्थी भवन,
फुटबॉल ग्राऊंडसमोर (कांकरिया तलावाजवळ) अहमदाबाद ३८०००८
फोन: ९७२५००५७९४, ९६३८७५२०२०, ९८९८४६५३६९

संतबाणी आश्रम १६ पी. एस. राजस्थान येथे सत्संगाचा कार्यक्रम
४, ५ व ६ ऑगस्ट २०१७.

***